| MHAH210003032017 | **निशाणी ५० खालील आदेश**<br>(सय्यद इब्राहिम वि. चंद्रकला इंगळे) |
| --- | --- |

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रमांक ९ याने त्याचेविरुध्द झालेला पुरावा बंद आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याचे कथनानुसार वादी यांनी त्यांच्या साक्षीदाराचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले होते. त्यानंतर वादी यांनी साक्षीदाराचे पुराव्याचे शपथपत्र चालवणे नसल्याचा शेरा दिल्याने प्रकरण मागील तारखेस प्रतिवादीच्या पुराव्याकामी नेमलेले होते. प्रतिवादी हा संस्थेचा प्रशासकीय अधिकारी असल्याने कामानिमित्त अहमदनगर येथे गेलेला होता. त्याचप्रमाणे प्रतिवादीचे विधिज्ञ हे देखील त्यांचे वैयक्तिक कामानिमित्त आष्टी येथे गेलेले होते. त्यामुळे प्रतिवादीचा पुरावा बंद केलेला आहे. प्रतिवादीस पुरावा देणे गरजेचे असल्याने त्याला पुरावा दाखल करणेची परवानगी मिळावी अशी त्याने केलेली आहे.

२. वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादी क्रमांक ९ याला पुरेशी संधी देऊनही पुरावा दाखल केला नाही म्हणुन दिनांक ०७.०२.२०२५ रोजी प्रतिवादी क्रमांक ९ चा पुरावा बंदचा आदेश न्यायालयाने पारीत केलेला आहे. सबब, अर्ज नामंजुर करुन रक्कम रुपये १०००/– खर्च ठेवण्याची विनंती त्यांनी केली आहे.

३. युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. दिनांक २१.०१.२०२५ रोजी वादीने निशाणी ४३ वरील पुराव्याचे शपथपत्र चालवणे नसल्याचा शेरा देऊन त्यांचा पुरावा बंद केलेला आहे. त्यानंतर पुढील तारीख दिनांक ०७.०२.२०२५ रोजी दावा प्रतिवादी क्रमांक ९ च्या

पुराव्याकामी नेमलेला होता. मात्र त्यांनी पुरावा दाखल केला नसल्याचे त्याचेविरुध्द पुरावा बंदचा आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर पुढील तारीख दिनांक ०५.०३.२०२५ रोजी प्रतिवादी क्रमांक ९ याने पुरावा बंदचा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्रमांक ९ यास पुरावा दाखल करण्याची संधी न दिल्यास प्रतिवादीचे अपरिमित असे नुकसान होणार असल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचा अर्ज रद्द केल्यास निश्चितच नविन वादाच्या निर्मितीची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मुळ दाव्याचे स्वरुप लक्षात घेता दाव्याच्या योग्य त्या निर्गतीकरिता प्रतिवादीस पुरावा दाखल करण्याची संधी देणे आवश्यक आहे. वादी यांनी घेतलेला आक्षेप विचारात घेता प्रतिवादी क्रमांक ९ वर खर्च ठेवणे गरजेचे आहे. परिणामी खालील आदेश –

| | **<u>आदेश</u>** |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी ५० रक्कम रुपये ५००/– खर्च वादीस देण्याच्या अटीवर त्यांच्याविरुध्द झालेला पुरावा बंद चा आदेश रद्द करण्यात येतो. |
| | (आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला) |

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.02.05 17:51:49 +0530

**( यु. ए. भोसले )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
**<u>जामखेड</u>**

दिनांक– ०५.०२.२०२६
ठिकाण – अहमदनगर.